
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २०६३



REFBK-0016282
REFBK-0016282

# आभाळवाटा

शंकर रामाणी

2063

आ भा ळ वा टा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
48220
2063

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

# आ भा ळ वा टा

शं क र

रा मा णी

दा. क्र. ९६२८२

REFBK-0016282

REFBK-0016282

मौज प्रकाशन

मौज प्रकाशन : १४५

पहिली आवृत्ती : १९६७

© १९६७, शंकर रामाणी

**किंमत चार रुपये**

मुखपृष्ठावरील चित्र
विश्वनाथ सोलापूरकर

प्रकाशक
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

सौ० रेखास .

# अनुक्रम


उन्हाळा १
सांज दाटतां २
हळूहळू ३
गूढ ४
अशी वैशाखलहर ५
शाप ७
पुनवेला अर्थ आज ८
दारीं सादते कोकिळा ९
मन आकाशाचें १०
ओल्या फाटक्या कौलांचें ११
मनाच्या गुहेंत १२
गाणें १३
अंधारांत विराट विश्व विरतें १४
तूं निघून गेल्यावरही १५
माझिया दारांत १६
आसवांची ओंवी १७
शल्य १८
पहिला पाऊस १९
अभिसार २०
कोसळलें रडें २१
अवेळीं २२
विटली कहाणी २३
सये, वेगळ्या आपुल्या
आज वाटा २५
फुटे प्राजक्ताचा सूर २६
आंबा फुलेना २७
धुकें २८
निरभ्र कुशीला २९
वेळअवेळाच्या मेळीं ३०
मी अशांत हिंडतां ३१
नहाण ३२
माझा विराट अंधार ३३
नभाला न या चंद्र आता फुटे ३४
झाडें ३५
हेंचि दे गा दान ३६
इथे काठ समृद्ध ३७
मेंदीरंगल्या मातींत ३८
हिशेब ३९
इथे हृदय ओवितें ४०
मी माझ्यांतच बुडून गेलों
आहें ४१
मीहि घननील व्हावें ४२
वेगळ्या नभाची ४३
ऐशा सुकृताचा थेंब ४४

वाटा ४५
कळेना कुठे वाट ४६
अश्रूंचा अभंग ४७
अलक्ष लागले दिवे ४८
मी फुलतां माझ्यांतुन ४९
मला जन्मांधाला ५०
उमलते अचानक ५१
कातरवेळीं ५२
मेणबत्तीसारखे तेवणारे तिचे डोळे ५३
एक माणूस ५४
एकाएकी मावळले ५५
मला अभाग्याला घडे ५६
कधी कधी ५७
राधा ५८
काळोखाच्या कावळ्यांना ५९
दिशातीत माझ्या ६०
श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीपाशीं ६१
वाटतें ६२
रात्र झाली गळाभर ६३
झिंगलेले शब्द ६४
झडे जगण्याची राख ६५
गझल ६६
तीन उन्हाचे दगड ठेविले ६७
नजरेला हिरवा सूर ६८
चिमण्या ६९
तुझ्यासाठी ७०
कोठेतरी जाणार होतों ७१
आठवण ७२
सावल्यांत जगतांना ७३
सांज ७४
एक कविता ७५
तळें ७६
माझें घरटें उडालें ७७
गोंदण ७८
गंधाला मत्त लकेर ७९
झाड ८०
वैशाख सोहळा ८१
एक अभंग ८२
थेंब थेंब गाणें ८३
हिरवे हिरवे मळे मनाचे ८४
तंद्रींतलें विश्व ८५
सांज धुंगुरली तेव्हा ८६
भेट ८७

पृष्ठ ५० वरील चवथ्या ओळीतील ‘जीर्ण’ शब्द ‘जीण’ असा वाचावा.

## उन्हाळा

चाफ्याहून तीव्र उन्हाचा वैशाखी घमघमाट
अंतर्बाह्य; चुकल्यामुकल्या पक्ष्याचा सूर आसमंतांत
सतारीवर खुडल्यासारखा पिळवटलेला सखोल;
विखारलेल्या तंद्रीची कर्पूरशुभ्र लय; अस्तित्व अबोल...
तंद्रीच्याहि पल्याड पापणीजड दिशा दिशा जवळलेल्या;
अज्ञेयाच्या माळावरून आभाळवाटा उधळलेल्या...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
५४२२० ८/१०/८८
२०६३ ८/३/८९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६२८२

## सांज दाटतां

सांज दाटली विटकररंगी;
वत्स उन्हाचें अंग चाटतें
श्रांत धरेचें, आणि पाहतें
जग विसरू दिवसाचें नातें...

सांज दाटतां विद्ध परतलें
एक पाखरू केविलवाणें :
दिवसभराची चोच कोरडी,
दिठींत पण अश्रूंचे दाणे !

## हळूहळू

हळूहळू सांज बुडे
लालबुंद रुसव्यांत;
हळूहळू जग दडे
सांवल्यांच्या विजनांत.

हळूहळू आर्त मुकी
विद्ध काळिजकहाणी...
हळूहळू साकळतें
डोळां तारकांचें पाणी.

## गूढ

सांजबनांतून उठे
काळोखाची हाक ;
पावलांच्या वाटेवर
सांवल्यांचा धाक...

ठायींठायीं अंकुरते
अवसेची खंत;
दिठींतलें नभ झुरे
ताऱ्यांनी अनंत.

पाहूं जातां डोह, तेथे
फुटेना तरंग;
बुडूनहि खोल खोल
सारेंच अथांग...

काळोखाचें उदासीन
उकलेना गूढ;
पावलांना पावलांची
उमजेना ओढ.

## अशी वैशाखलहर

असें नेहमीच घ्यावें
माथां वैशाखाचें ऊन;
असें नेहमीच जावें
इथे लासून-पोळून.

राख झालेल्या मनांत
खोल दुःख ठिणगावें;
संथ आकाशाने आत
वेदनांनी ठणकावें.

अशी वैशाखलहर...
तुटे दुखलेला आंबा;
अर्धमिटल्या दिठींत
विरे जगण्याची आभा.

कोरड्याच जिव्हाळ्याची
इथे देणाऱ्याची भाषा;
इथे उमाळ्यावाचून
ओला डोळ्यांना दिलासा.

ओठीं पेटली तहान
आग तृषार्ताने प्यावी;
आणि मनाच्या कवेत
खुळी आस जोजवावी...

तीव्र वैशाखाच्या झळा
ग्रीष्म झालें रोमरोम;
कधीतरी पाझरावें
गर्द आषाढांत व्योम.

## शाप

विझलेल्या रात्रीचे
अजुन मंद मौनदिवे;
झाडांच्या मुग्ध तळीं
छायांचें जळ फसवें.

बुजलेली जखम; हवा
पंखांना गगनडंख;
रक्तांतिल पापांचा
पुसलेला अन् कलंक...

पुसलेला जरि कलंक
रुतलेलें शल्य खोल;
भिनलेला नसनसांत
रात्रीचा शाप घोर.

## पुनवेला अर्थ आज

काठ काठ डुंगित मी
रात्र रात्र भग्न फिरें;
आसवांत मुरलेलें
लोचनांत गीत झुरे.

सावल्यांत विर्वळलें
धरतीचें दुःख मुकें;
गात्र गात्र पांघरतें
मौनाचें गर्द धुकें.

या धुक्यांत लपलेली
जपलेली गूढ व्यथा;
ऐलपैल ना; मधेच
फसलेली मात्र कथा.

रात्र रात्र पोशित मी
गहन तमाच्या गर्भी;
पुनवेला अर्थ आज
अवसेच्या संदर्भी.

## दारीं सादते कोकिळा

दारीं सादते कोकिळा
तरी फुलेनाच चाफा;
खोल जपतें आकाश
चैत्रवैशाखाच्या वाफा.

केव्हापासून तिष्ठतें
रुक्ष रिकामें राऊळ;
कालच्याहि निर्माल्याचें
नाही ओंजळीला बळ.

गर्द उमाळा ओलावा:
रुजूं घातलेलें रोप;
गात्रागात्रांत तुडुंब
ग्रीष्मगर्भ अनुताप.

तरी फुलेनाच चाफा;
साद कोकिळेची खोल;
मुकें पापणींत आसूं
गळां साचलेला बोल...

## मन आकाशाचें

शुभ्र नक्षत्रफुलांनी
माझें माखलें आभाळ;
आली सावळ्या दिशांना
जाइजुईची भोवळ.

आज अवसेची रात:
कळ्याकळ्यांना बहर;
सारें गगन वाकलें
सोसतांना फुलभार.

देणाऱ्याने दिले हात
असें घेण्यासाठी दान;
मन आकाशाचें तरी
माझी ओंजळ लहान

## ओल्या फाटक्या कौलांचें

ओल्या फाटक्या कौलांचें
हसूं श्रावणपिवळें;
दुःख विसरून सारें
घर हासतें एकलें.

न्हात्याधुल्या चांदण्याचा
आत शिरे कवडसा :
सुख बाहेरून असें
घेतें हळूच कानोसा.

लाल कळे काजव्यांचे
ओंजळींत फुलूं आले;
आहे ओठावर पूजा,
खुलीं देवळाचीं दारें.

गंधधुंदींत श्रावण :
कुठे कांही उतूं जातें...
ओल्याफाटक्या कौलांचें
जडे गगनाशीं नातें.

## मनाच्या गुहेंत

मनाच्या काळ्याकुट्ट गुहेंत
कितीहि दूरवर पाहिलें
तरी कांही दिसत नाही.
दिसतात फक्त
मेलेल्या मानवाच्या
खुज्या रक्ताचे डाग
विस्मृतींत थिजलेले.

## गाणें

गात्रागात्रांतील गाणें
अजून विझलेलें नाही;
वास उडून गेलेल्या फुलासारखें
भोंवतालचें विश्व आहे
उदास, कोमेजलेलें.
कुठे झुळूक नाही,
तरंग नाही;
घरट्याच्या वाटाहि
आता मावळल्या आहेत...
मी कुणासाठी इथे थांबलों आहें ?
गात्रागात्रांतील गाणें
अजून विझलेलें नाही...

## अंधारांत विराट विश्व विरतें

अंधारांत विराट विश्व विरतें निःस्तब्धता लेवुनी;
शून्याकार मनांत मात्र अजुनी जागें मुकें वादळ;
कोठे गूढ तळीं विचित्र हलती छाया खुज्या भेसुर;
माझ्यांतील कुणी अशब्द तिथली हुंगी उदासीनता.

निद्रेच्या थडग्यांत जीव निजले. मृत्यूच मारी मिठी.
प्रेतांना उबवीत जागत बसे आत्मा स्मशानांत या.
मोहाचे घट फोडिले कितिक हे. वैयर्थ्य सारें पटे...
दृष्टीला न दिसे असें अतुल मी कांहीतरी पाहतों.

मृत्यूची दुनिया कुठे विसरलों ? तें सत्य आहे कुठें ?
मेंदीहून सुरक्त नाजुक असा हातीं तुझा हात गे !

## तूं निघून गेल्यावरही

तूं निघून गेल्यावरही
जें विझून उरलें गाणें,
तें हृदय अकारण बसलें
कवटाळुन स्वप्न दिवाणें...

धुगधुगत्या अवशेषांची
मी राख फासली भाळीं;
सुख छळत राहिलें मागे
तूं निघून गेल्यावरही...

## माझिया दारांत

माझिया दारांत
चिमण्या आल्या;
अबोल कांहीसें
बोलून गेल्या.

कळलें सारें नि
कळलें नाही;
मनाची अबोध
हासली जुई.

दाटून दिशांत
उतला गंध;
झडली जागीव
गळले बंध.

प्राणांस फुटले
अद्भुत पंख;
तंद्रींत भिनला
आकाशडंख...

माझिया दारांत
चिमण्या आल्या;
आगळेंवेगळें
सांगून गेल्या.

## आसवांची ओवी

रुजूं आलें खोल
वैशाखाचें बीज;
आषाढक्षितिज
वाकलेलें.

वेदनेची वीज
उरीं जोजवावी;
आसवांची ओवी
अनुभवावी.

## शल्य

रात्र पेरते तमांत शुभ्र जाइचें हसूं
विस्मरून डंख, दुःख मोहरे तसूतसू
विसंवुनी उद्यावरी निवांत मान टेकिली
कल्पनेंत लागल्या अलभ्य तेजचाहुली ;
...उजाडलें; दिशांत दूर धुंद एक पांखरू
भरारतांच लागलें उरांत व्योम संचरूं;
गगन पातलें घरांत; नेणिवेंत डुंबतें...
कोरड्या खुल्या मुखांत तृप्तिकुंभ पालथे.

कां असें निठूर दैव चारुतेंत गुंतलें ?
जाइच्या हसूंत खोल खुपत शल्य राहिलें !

## पहिला पाऊस

मृगाच्या पहिल्या
धुवांधार पावसांत
मनाच्या राठ मातीलाहि
सुगंधाची एक उन्मत्त लकेर फुटते
आणि उगाचच
आसुसलेला जीव
हुर्मुजी लाज सावरीत
घुटमळत असतो
आषाढाच्या वाटेवर...

## अभिसार

तुझे नावगाव
आलें पुशीत पुशीत;
नऱ्हाळीचा डाव
न्हालें श्रावणसरींत.

इथेतिथे सारी
ओली चुडागर्द धुंद;
निथळतो उरीं
नसानसांत गोविंद.

डुंबतें निर्भय
दोन मनांच्या संगमीं;
गवसलें श्रेय
स्पर्शातीत समागमीं.

तुझें नावगाव...
नको वावुगा वेव्हार;
नऱ्हाळीचा डाव...
पुरा माझा अभिसार.

# कोसळलें रडें

वाहतात येथे
अनोळखी वाटा;
काळोखाचा काटा
रोमरोमीं.

ढळणाऱ्या वेळे
पान्हावली माया;
मज माझी छाया
साथ झाली.

बुडूं यावें खोल
ऐशी तळमळ;
अथांगाचा तळ
अंतरांत.

बुजलेलीं तमीं
डोळ्यांचीं कवाडें;
कोसळलें रडें
प्रकाशाचें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९६२८८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# अवेळीं

अवेळीं आकाश अचानक दाटून येतें,
अवेळींच बरसतात वैशाखदग्ध ढग,
अवेळींच वाढते अबोध अशब्द तगमग.
नी अवेळीं हुरहुरून व्याकुळतें जग.

अवेळीं निकट उत्कट आठवणी जागतात :
पापण्यांना सलतें असावध अश्रूंचें वळ;
अवेळींच जुनाट झालेल्या अजाण जखमांची
जाणवते पुन्हा हताश जीवघेणी कळ.

तुडुंबलेल्या तंद्रींत खोल खोल हरवतांना
अवेळींच अवचित आकळते अथांगाची लय;
अवेळीं अज्ञात अनंत वाटेला पावलें वळतांना
निर्मळ एकांताचें उघडतें अबोल हृदय.

चुळकाभर जीवन विशाल करणारा महान् क्षण
अवेळींच येतो लखलखत विराटांत न्हाऊन...

## विटली कहाणी

डोळ्यांतलें पाणी
पाहूं नये कोणी
ऐसा हा निर्धार
पेलून सोसतां
जगण्याचा भार;
अस्कडशा वाटे
ओसाडींत कांटे
खुपतात खोल;
रक्त अनमोल;
जपून जोडावी
जिणेची पुण्याई;
जखमांचीं फुलें
ईश्वराच्या पायीं
वाहून मोकळें
व्हावें; घोळवावें
वांझलेल्या ओठीं
जीवघेणें हासूं,
लपवावे आसूं.
अंधावले आज
ईश्वराचे डोळे
(आंधळ्यासी जन
अवघे आंधळे).

डोळ्यांतलें पाणी

पाहूं नये कोणी
ऐसा हा निर्धार
पेलून जगतां
विटली कहाणी...

## सये, वेगळ्या आपुल्या आज वाटा

सये, वेगळ्या आपुल्या आज वाटा;
नव्हाळींतलीं बावलेलीं उन्हें;
दुराव्यांतही ना उसासे; स्मृतींचें
उरीं चेतवावें वृथा चांदणें.

अनोखी पथांचें पिसें पावलांना;
नभाची मुकी साथ आहे निळी.
तिरीं सावल्यांच्या फुलेनाच वन्ही
तरी तेज आहे तमाच्या तळीं...

असें एकटें विश्व हुंगीत जावें;
रुजाव्या कळा—आसवांच्या कथा...
सये, वेदना तीव्र झाल्याविना गे
कळावी कशी कोमलांची व्यथा ?

इथे दुःख प्यावें स्वतःचें; पुसावीं
स्वतःचींच भोळींखुळीं लोचनें;
अमेच्या प्रवाहासवें वाहतांना
तमीं पोळुनी पक्व व्हावें जिणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
क्रमांक 68220 दि. 8/10/21
वर्ग 2083 नों. दि. 9/3/09

## फुटे प्राजक्ताचा सूर

निरोपिल्या दिवसांचें
नातें नारिंगी ढळतें;
मालवल्या क्षितिजाला
खोल कांहीसें खुपतें...

कळ नावरून झोंबे
काळेंसावळें काहूर;
साकळल्या वेदनेला
फुटे प्राजक्ताचा सूर...

# आंबा फुलेना

आंबा फुलेना, फळेना;
मैना रुसली, बोलेना;
गेला परदेशीं रावा
त्याचा बोल आठवेना
त्याचा बोल आठवेना...

डोळियांच्या डोहाकाठीं
नार पाण्याला निघेना;
तिच्या वाटेंत भांगाच्या
खुळें पाऊल खिळेना
खुळें पाऊल खिळेना...

रानारानांत त्वचेच्या
पोर नंदाचा शिरेना
कुंभ विसरून कोटे
भोळी गौळण फसेना
भोळी गौळण फसेना...

आंबा फुलेना, फळेना;
मैना रुसली, बोलेना:
गेला परदेशीं रावा
त्याचा बोल आठवेना
त्याचा बोल आठवेना...

## धुकें

हें धुकें मुकेंच मंद दाटलें :
मुकेपणांत गगन झाकलें;
पंख-फाटलें अबोल पाखरू
वाहतें दिशांत मात्र एकलें.

कोवळे अजाण दोन डोळुले :
पापण्यांतली पहाट बावली;
कोटरांत कुंद सांज-पावलें,
एकटेपणांत चूर बाहुली.

या क्षणीं उदास ऊर हुंगतें,
चुंबितें विराट एक सावली;
या क्षणीं विझून सूर फाकते
धुंद आगळीच भैरवींतली.

# निरभ्र कुशीला

निरभ्र कुशीला मोहर यावा प्राजक्तरात्रीं :
क्षणांच्या युगांचें पिकावें मोहळ भ्रमरगात्रीं;
रेताड मनांत रुतले आहेत वैशाख जरी
अद्भुत क्षागळा तरंग उठावा जीवनपात्रीं.

स्वप्नअंगाईने जोजवावें सुख; चोचींत चोच;
पोळल्या पथांना फुटावी हळवी श्रावणपाच;
माहेरमायेने भिजावें चांदणें बकुळतळीं :
स्वप्नांतच शर झोंबून झडावा विहंग तोच.

मन्मथगंधित मातीला उद्याची दग्ध चाहूल...
निरभ्र कुशींत जागतें जळतें जिणेचें फूल.

## वेळअवेळाच्या मेळीं

वेळअवेळाच्या मेळीं
तुझ्या डोळ्यांत डुंबावें;
पुळणींत थोडेंथोडें
माझें सुख ओसरावें.

फिक्या जांभुळल्या जळीं
भुऱ्या क्षितिजाची भूल;
जागवावी किनाऱ्याने
शुभ्र मोतिया चाहूल.

फक्त काळजाला ठावें
तळीं अथांगाचें देणें;
तेथे जपावें पाऊल
ओल्या तलम तंद्रीने.

वेळअवेळाच्या मेळीं
तुझ्या डोळ्यांत डुंबावें;
भरतीच्या काठावर
थोडें सुख फेसाळावें...

## मी अशांत हिंडतां

मी अशांत हिंडतां
साद गुंतली कुठे ?
रंगरंग बावतां
व्योम संथ वांझुटें.

वाहतात पावलें
अंध ओवळ्या दिशा;
रोमरोम झोकतें
सावळी-निळी नशा.

कोण थांबलें इथे
ही अवेळ चुंबुनी ?
या रित्याच राउळीं
दीप लावले कुणीं ?

मी अशांत हिंडतां
मी मलाच सादलें;
झिंगल्या तमांतही
गंधगीत पेटलें.

# न्हाण

ओसाड नसांत
उन्हाचाच कोप
लावियेलें रोप
अव्यक्ताचें.

सोसवेना खोल
निःशब्दाची झळ;
काळोखाचा पीळ
काळजाला.

तरीहि कोरडें
आषाढगगन;
मातीला न्हाण
नाही आलें.

# माझा विराट अंधार

मुक्यामुक्यानेच सारी
रात खुडणारे डोळे;
विझलेल्या सोबतीचा
चंद्र विस्मृतींत जळे.

खोल एकांताच्या तळीं
फुटे अथांगाला बोल;
तम वेचतांना कळे
भग्न सावल्यांचें मोल

तार-तार तापलेली
कोण छेडतें सतार ?
सूर-सूर झोकलेला
माझा विराट अंधार.

## नभाला न या चंद्र आता फुटे

व्यथावेगळें दाटतें खोल पाणी;
दिशांचा न या कांठ कोठे दिसे;
निशानग्न काळी कथा कावलेली...
इथे पावलांचे इमानी ठसे.

त्वचेला लुळेफाटके लक्ष डोळे,
उरीं वर्षणारें नसे चांदणें;
पथीं प्राण पाषाणसा वाहतांना
उरे फक्त ओसाडलेलें जिणें.

अशी दाट ही रात तेजाळणारी
तरी हाक दूरांत रानीं उठे.
परी दाटलेलें दिशाहीन पाणी :
नभाला न या चंद्र आता फुटे.

## झाडें

झाडें काळोखांत जगतात,
जेव्हा हंबरणाऱ्या दिशांच्या वाटेवर
अनंताचा सूर पकडणारीं भिरीं
निद्रेच्या निःस्तब्ध लयींत
पर्णहीन शेजेवर भोगतात
एक उत्सवगीत
अलक्ष हिरव्या कळांनी ओथंबलेलें.

आज शिशिर-छायेंत
पहुडलेल्या पाचोळ्यालाहि वरदान आहे
मरणाची मिठी अनुभवतांना;
कारण मी ऐकतों
भविष्याला निःशब्द साद घालणारी
विराट प्रार्थना
अंधारलेल्या फांद्यांच्या बरगड्यांतून
खोलखोल स्फुरतांना.
झाडें काळोखांत जगतात...

## हेंचि दे गा दान

डोळियांचें देणें
दिशांपार गेलें :
विश्व झालें निळें
रोमरोमीं.

ऐसें ब्रह्म आज
परते माहेरा :
चोचींतला चारा
लाखमोल.

हेंचि दे गा दान.
कुमेरली काया :
फुलो फळो माया
आकाशाची.

# इथे काठ समृद्ध

कुठे दूर मी वेगळा वाहणारा :
तमाला न माझ्या खुळीं बंधनें;
दिशांचीं कुढीं खोलतांना कवाडें
अमेंतून ओसंडतें चांदणें.

पथीं पेरतों पत्थरांचीच वाणी :
खचेला तिचा आंधळा आसरा;
श्रुती लक्ष गर्भांतुनी पोसलेल्या :
कुणाचा तरी खोल वाहे झरा...

मनाच्या मुक्या मध्यरात्रीं फुलावी
निखाऱ्यापरी नागवी यातना;
कुठे दूर मी वेगळा वाहणारा;
इथे काठ समृद्ध माझ्याविना.

## मेंदीरंगल्या मातींत

मेंदीरंगल्या मातींत
हिर्वी धरतीचीं गाणीं;
बावलेल्या ओंजळींत
थोडें ऊन, थोडें पाणी.

पोळलेल्या पावलांना
ओलें-खुळें वरदान;
खोल वाहत्या डोळ्यांत
सात रंगांची कमान.

आज गंधून वेदना
फुले, फळे तसूतसू;
बावलेल्या ओंजळींत
थोडें हसूं...थोडे आसूं...

## हिशेब

कसा करावा आपुल्या
देण्याघेण्याचा हिशेब ?
रत्नखचित रातीचें
खाली वाकलेलें नभ !

## इथे हृदय ओवितें

इथे हृदय ओवितें अतुट आसवांच्या सरी;
व्यथा पिकुन वाकतें विफल विश्व माझ्यावरी :
असें व्यथित वेंधळें अजय जोजवीतां जिणें
कसें तिमिर चेतवूं? चढत ही निशा आंधळी.

तुडुंब जळ वाहतें; बुडत मी तमाच्या तळीं;
तुझे चरण चुंबितों गमत या रित्या राउळीं.
नशा नसनसांतुनी; जहर जांभळें लोचनीं;
निळीं नवलगोपुरें जळत दिव्य भासांबरीं.

अहा! जिवलगेपरी बिलगुनी मला वेदना :
उचंबळत अंतरीं विकल बोबडी भावना;
पुरें पिकुन वाकलें विफल विश्व माझ्यावरी :
अशांत लहरींवरी तरत मी सुनाच्या सुना.

# मी माझ्यांतच बुडून गेलों आहें

मी माझ्यांतच पार बुडून गेलों आहें
जसें कभिन्न काळोखाच्या पुरांत विरलेलें जग;
लक्ष लक्ष मरणें भोगूनहि लक्ष वेळ
कुठून जाणवते कळत नाही श्वासापुरती धग.

विगरींतल्या पोराने धुळाक्षरें पुसावींत
तितक्याच पुसट उबगलेल्या पांगुळ वाटा;
बुडतांनाहि किती सोसावें ! पाय तरंगतात वर
आयुष्याचा चिमूटभर अर्थहि वाहतो उलटा.

तळापाशीं गुळचट गाळ; पण कितीहि गुदमरलों
तरी कमळ का होणार आहे माझें वांझुट वेड ?
मी तर कधीचाच रुतून बसलों आहें माझ्यांत
निरर्थाचें गूढ उकलीत; ओहोळते अवसेची तेढ...

## मीहि घननीळ व्हावें

दिसामाजी जळतांना
थोडी राख झडों द्यावी;
लाल माया निखाऱ्याची
उरींपोटीं पाखरावी.

रोमरोम अंगारतां
फुलीं फुले ग्रीष्मगर्भ;
ऐसें खोलखोल कांही
अनुभवावें दुर्लभ.

तमतुडुंब तंद्रींत
नभ झाकळून जावें;
अंग-अंग आषाढतां
मीहि घननीळ व्हावें...

## वेगळ्या नभाची

वेगळ्या नभाची
मला सोनभूल;
अदृष्टाचें फूल
गर्भवासीं.

लक्ष वेदनांच्या
पुण्याईचें बळ;
पंखांतून कळ
आकाशाची.

ओथंबलें डोळां
काळोखाचें रडें;
फुटलें तांबडें
व्यथेपार.

## ऐशा सुकृताचा थेंब

गूढ मौनाच्या सावल्या
गर्भगंगेंत नाहल्या;
काळजाच्या काठावर
एकांतांत विसावल्या.

चैत्र-लावण्याचा धूप :
उजळलें रूप रूप;
रंध्रारंध्रांतून ओलें
सुख सांडलें अमूप.

ऐशा सुकृताचा थेंब
सूर होऊन स्फुरेना;
उरीं भोगिलें तयाचें
डोळां गगन मावेना.

## वाटा

पुसाव्यात कोणा
काळजाच्या वाटा ?
खुपलेला काटा...

...तितुकें जपावें
डोळियांत पाणी
—तुडुंब कहाणी.

## कळेना कुठे वाट

कळेना कुठे वाट झेपावलेली
मला आज आलिंगते अंतरीं;
दिशा पावलांची निशा हुंगणारी
तिच्या खोल आरक्तल्या चाहुली.

कुणी सादलेलें त्वचेच्या तमाला ?
दिठीं वेगळें ओज ओथंबलें;
पिक्या वेदनांच्या नभांतून खाली
झरे सारखें चांदणें कोवळें.

मला एकट्याला इथे वाळवंटीं
पुरे फक्त माझी पिशी सावली :
कुठे वाट झेपावलेली कळेना;
मला विश्व आलिंगतें अंतरीं.

## अश्रूंचा अभंग

पापणींत झुळे
अश्रूंचा अभंग;
तरंगाचें अंग
आकळेना.

तळाहून खोल
झेंपावे जाणीव;
अथांगाचें हीव
अर्थालागीं.

आता काय कैसें
अबोलांत बोलूं ?
अनंताचें खोलूं
अंतरंग.

# अलक्ष लागले दिवे

कुशींत दुःख झोपलें,
पिकून झोंबली निशा;
विवस्त्र सावल्यांसवें
नसांत नाहते नशा.

अवेळ हुंगतें कुणी
मनांत गंध माळुनी;
धुक्यांत वाट धुंडितें
घरांत वात लावुनी.

तमांत जीव गुंफितां
सुदूर विश्व जागलें;
तुला न पाहिलें; उरीं
तुझीं प्रकाशपाउलें.

नशेंत स्वप्न वाहतें :
उडून भागले थवे...
व्यथालयांत माझिया
अलक्ष लागले दिवे.

## मी फुलतां माझ्यांतुन

वठलेल्या वाटेवर
मी फुलतों माझ्यांतुन;
चतुर चैत्रगंध उठे
शिशिरधुंद मातींतुन.

विझलेल्या पंखांचें
भग्न खुळें भिरभिरतें;
अवसनग्न नजरेला
किरणांचें कवन फुटे.

नवल असें हिरवळतां
पाऊलहि परिमळलें;
मी फुलतां माझ्यांतुन
खुडुन कशीं घेउं फुलें ?

# मला जन्मांधाला

मला जन्मांधाला अवचित नवे नेत्र फुटले :
मृगाच्या मातीचें नवल हिरवें खोल रुजलें;
मनाच्या मेघांचें धन पिकुनियां कुंभ झरती;
अनंगाच्या रानीं अवखळ फिरे जीर्ण गरती.

मला जन्मांधाला अबलख पुन्हा पंख जडले :
विराटाचें नातें नकळत उरीं नग्न भिनलें;
अमेच्या ओठींचें जहर पिउनी ध्वांत विरतें,
जरेच्या भोगांचें वसन भगवें जीर्ण ढळतें.

मला जन्मांधाला अघटित असें विश्व स्फुरलें :
अगाधाच्या दारीं बसुन झुरतां पुण्य फळलें;
द्युतीचें सोनेरी वलय फुलुनी गंध गळती;
अता प्रारब्धाचे विहग नवखे पंथ पुसती...

## उमलते अचानक

उमलते अचानक
सोनकेवड्याची सर;
थेंबाथेंबांत तरंगे
ओला आभाळाचा सूर.

राठ मातीलाही माझ्या
फुटे श्रावणसुगंध;
काळजाचें केळपान
नवा केळवितें छंद.

नसानसांत छळते
एक छटेल गौळण;
खोल निथळत आहे
माझा घनांधार कृष्ण.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थानिक
78220 दि. 9.1.02
2063 9.13.07
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 96202

## कातरवेळीं

कातरवेळीं
एखाद्या उतट आठवणीला पकडून
झोपाळतांना
मनाची लय लागते
नी कुठून तरी
रात्रीलाहि फुटतात हात
अलगद खुडायाला आभाळजुई...

तंद्री मावळल्यावर मात्र
काळीज चिरून जातो
अंधाराचा अफाट आक्रोश
विराटांतून कोसळणारा.

# मेणबत्तीसारखे तेवणारे तिचे डोळे

मेणबत्तीसारखे तेवणारे तिचे अथांग शीतळ डोळे
वेळीअवेळीं अंधारांत बुडतांना मी पाहिले;
मात्र तिच्या वेदनेचे विराट घनगर्द काठ
नेहमीच माझ्या दिठीपार, दिशांपार राहिले.

कितीदा कातरवेळीं काळजाच्या निकट निकट आलों
तरी जवळिकेचा गंध तिला फुटलाच नाही;
मध्यरात्रीच्या मरणगीताचे सूर सूर खोल जपून
किलबिलणाऱ्या वेळेला भरारलों दिशांत दाही.

तिच्या अस्तित्वाच्या आभाळवाटा अंगांगांतून पाजळतात
अनंताशी अबोल नातें जोडून थेंब थेंब जगतांना;
मी असा वंचित, एकाकी प्राण प्राण पाखडणारा
तिची तुडुंबलेली व्यथा दिशांपार दरवळतांना...

# एक माणूस

चिंधावलेल्या अंगाचा एक माणूस
नेहमीच असतो 'लिली गार्डन'च्या कॉर्नरवर,
संध्याकाळीं,
एका त्रिकोनी कट्टयावर टेकलेला,
समोरचें मायमोकळें क्षितिज
नजरेच्या कवेंत घेत, जोजवीत
एकांतपणें.
(त्याचें मौन असावें अथांग समुद्रासारखें)
पण जेव्हा लाल-जांभुळ-निळे झुंबर झर्कन् कोसळतात
नी पश्चिम आकाश-ओठाला रंगांचे
सचित्र बोल स्फुरतात ऊर्मीप्रमाणें,
तेव्हा त्याचे क्षितिजसंपन्न डोळे
बोलतात कांहीतरी गूढ, तरल...
विश्वाला पालाण घालणारें!
मी मात्र त्याच्या डोळ्यांत एकटक पाहात असतों
गंगेच्या पाण्यांत पाहावें तसें...

# एकाएकी मावळले

एकाएकी मावळले अंधाराचे दीप :
विझलेला चंद्र निजे चरणांसमीप;
गात्रागात्रांतून गळे गहनाचा गंध;
ऐलथडीं कृष्ण; पैल पावरीची धुंद...
अबोधाच्या आकाशाला शुभ्र पान्हापूर;
घुंगुरसा जडे पायीं पाखराचा सूर.
पंख पालवतां झालें कवाड मोकळें;
पाजळतां अंग-अंग वलय वेगळें...

# मला अभाग्याला घडे

रात चंद्राशी रातली,
बिंब डहुळलें डोहीं;
निळाजऱ्या आरशांत
रूप ओखण्याची घाई.

देण्याघेण्याच्याहि पैल
निघे नव्हाळीची नाव;
कधी नयेच विचारू
ऐशा उन्मनीचें नाव.

आता अतर्क्याच्या पार
चंद्र-रात्र दोन्ही : एक;
मला अभाग्याला घडे
अज्ञाताचा अभिषेक...

# कधी कधी

कधी कधी
स्वप्नांत
उमलतें मरणाचें आकाश
नी दिशांच्या कार्तिककोवळ्या ओठांना
फुटूं फुटूं येतें अनावर हसू चैतन्याचें :
अशा वेळीं
मी निर्भय उभा असतों
अलिप्तगंगेच्या समृद्ध काठावर,
निरभ्र पाण्यांत
जगण्याची निरर्थक पडछाया न्यहाळीत
तळासाठी आसुसलेली.
आजुबाजूला झिमगार असतें;
फक्त आत्म्याचें अगाध शरीर
चोखाळतें त्वचेच्याहि पैल पालवणारी
एक अभोगी वाट...
जिथे प्रत्येक पावलाला
कोंभ येतात नव्या जाणिवांचे
मरणाला सहर्ष सामोरें जातांना.

## राधा

अवेळाच्या आडोशाला
एकटीच न्हालें;
तेथे नंदाच्या पोराने
चोरून पाहिलें.

तेव्हापून मीच माझा
उचलतें डाव;
तेव्हापून अजाणतें
यमुनेचा ठाव.

# काळोखाच्या कावळ्यांना

काळोखाच्या कावळ्यांना
येते अवेळींच जाग;
खोल हुंकाराच्या तळीं
धुमसते काळी आग.

काळोखाच्या कावळ्यांची
रिघे पैलपार हाक;
किनारते अवसेला
एक जीवघेणी झाक.

काळोखाच्या कावळ्यांशी
बोलूं जातां बोलवेना;
त्यांची नजर कोरते
खोल अदृष्टाच्या खुणा.

## दिशातीत माझ्या

उन्हाला इथे साद येते कुणाची ?
मला मीच मृत्यूंतुनी हुंगतों;
दिठीच्या दिशातीत ओथंबलेलें
निशानग्न आकाश आलिंगतों.

तिथे झोंबती पाखरें पावलांचीं,
भुई भोगते दान हें वेगळें;
मुकीं मोकळीं काळजाचीं कवाडें,
खुळीं वेचती गूढ रात्रींतलें.

उन्हाच्या उरीं सूर गुंफून गेलें
तमांतून या कोण कोणीकडे ?
त्वचेची नशा आंधळी अस्तलेली,
दिशातीत माझ्या फुटे तांबडें.

## श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीपाशी

पाण्यालाहि भिडे
आळंदीची वाट;
मृदुंगते साथ
वैष्णवांची.

दुपारल्या डोळां
इंद्रायणी वाहे :
कौतुक होताहे
संचिताचें.

अबोलाचा बोल
वाळवंटीं रुजे...
वांझ ऊर माझें
शब्दब्रह्म.

## वाटतें

वाटतें...
आत्ताच फ्रेम करून टाकावी
दिवेलागणीची
ही गर्भवती वेळ;
तुझीहि काळीनिळी तळ्याची तंद्री.
मी पण अभागी, सये !
मला पकडतांहि नाही येत शब्दांत
गाभुळ आठवणीचे
दोन उदास पारवे !

## रात्र झाली गळाभर

रात्र झाली गळाभर,
फुटे सावल्यांना काठ;
नार निघाली पाण्याला,
पायफसणीची वाट.

ऐशा अवकाळीं जडे
मनपवनाला गंध;
खोल उमले, उजळे
चोरचांदणीचा छंद.

आता तुडुंबली रात,
घाट पाण्यांत वितळे;
अर्ध्या वाटेवर नार
चिंब तंद्रींत निथळे.

## झिंगलेले शब्द

झिंगलेले शब्द :
जसे माघपुनवेला
अवकाश पिऊन तर्र झालेले
बांधावरले माड.
...तुझ्या-माझ्या अस्तित्वाचे अलंकार
स्थलकालातीत गळून पडलेले
(पडूं देत).
आता निरभ्र नग्नतेलाहि आहे
एक सुरंगी साज.
मनामनाच्या मुकुंद-मिठींत
धुंदावून दर्वळते आभाळाची लाज.

## झडे जगण्याची राख

थेंब थेंब जळतांना
झडे जगण्याची राख;
अजाणत्या अंधारात
खिरे अनोळखी हाक...

धुळींतच रेंगाळतें
एकटाकी जिणें
तरी अवचित कोठे
सळसळतात पानें.

जुळते कळेना कशी
अदृष्टाची ओळ;
कोसळत्या क्षणांनाहि
फुटे नक्षत्रांची वेल.

अजाणत्या अंधारांत
उसासतो चैत्र;
झडे राख; हळूहळू
मिट्ट मिट्ट नेत्र.

## गझल

रक्तांतल्या रुजल्या दिशा; डोळ्यांत क्षितिजें गुंतती;
स्वप्नांत रुतलीं पाउलें; हिरव्यांत रानें हालती.
ऐलाड भिजलेल्या कथा...पैलाड उतलें चांदणें:
त्या तरं पुनवेच्या तळीं मी वेचतें बुजऱ्या स्मृती.
टाळूनही टळतील का भरतींतलीं जळचुंबनें ?
न्हात्याधुत्या पुळणीस का होईल त्यांची विस्मृती ?
गात्रांतुनी चैत्रांतल्या वाटा किती विस्तारल्या:
माझा खुळा रावा कुठे ? काही दिसेना भोवती.
मम एकलेपण प्राशुनी सजलें कुंवार पिसें उरीं;
रक्तांतल्या फळुनी दिशा उरलें तरी मी एकटी !

## तीन उन्हाचे दगड ठेविले

तीन उन्हाचे दगड ठेविले
आणि रांधलें जिणें;
माध्यान्हींचा सूर्य ढाळतो
माथ्यावर चांदणें.

पदराखाली बाळ जपावें
जखम तशी झाकिली;
अंगाईला मुकीं-मुकीं
मम हृदयाचीं स्पंदनें.

दो दिवसांच्या मुशाफरीला
फुटे दग्ध पालवी;
नसांतल्या घनगर्द तमाचीं
घमघमलीं काननें.

तीन उन्हाचे दगड ठेवुनी
आज रांधलें जिणें.

## नजरेला हिरवा सूर

नभ ओथंबुन सर येते,
झाडांची चिंब विराणी;
घरट्यांत पाखरें ओलीं,
फसलेली विद्ध कहाणी.

श्वासांत सुन्न बुडताहे
मातीची गंधित किमया;
शेजेला स्पर्शसुखाची
क्षणभंगुर उमले दुनिया.

परि कुठुन तरी भिडलेला
नजरेला हिरवा सूर;
प्राणांत विजेचे वळसे
अन् दुःख हसे भरपूर.

# चिमण्या

काळोखाची पुसट पुसट
लांबच लांब तिरकस तार;
चिरगुटलेल्या दोन चिमण्या
विसावलेल्या नजरेपार...

काळोखाची पुसट पुसट
ओळख अशीच जांभुळगार;
अजाण अभ्रें उडून जातात
दिवसामागून दिवस पार

## तुझ्यासाठी

आज डोळ्यांनी टाकिलें
माझें आभाळ गहाण;
तुझ्यासवे उडण्याची
माझी मालवली आण.

खोल गात्रांना भिडली
चिंब अंधाराची वाट;
अंध देहावर फिरे
सर्द सांवल्यांचा हात...

रुते घरळ्याचा शाप,
वांझ पापण्यांची खंत;
तुझ्यासाठी फळूं आलें
माझ्या व्यथेचें दिगंत.

# कोठेतरी जाणार होतों

मी कोठेतरी जाणार होतों,
पण तें आता आठवत नाही;
माझ्या पावलांचें गबाळ गल्बत
नांगरून पडलेलें दिशांत दाही.

लांबच लांब
एक वैतागलेला दुखणाईत काठ;
समोर अंत नसलेला समुद्र
नीलकंठ; तळापासून ओहोटलेला, अशांत.
निथळणाऱ्या उन्हाची सावली पांघरून
मी कधीतरी निघणार होतों
('कोणीकडून कोणीकडे ?')
माझ्या स्मृतींचे ठसेहि आता मालवलेले:
तेच या अफाट ओसाडींत न्यहाळणार होतों.

मी कोठेतरी जाणार होतों...
पण तें आता आठवतच नाही.

## आठवण

रेशमी रात्रीला भिडे
ओला आभाळाचा काठ;
तुझी आठवण दाट.

दुरून झिंगून येतो
पिकल्या भाताचा वास;
—माझ्या तृप्तीची मिजास.

## सावल्यांत जगतांना

सावल्यांत जगतांना
जग अनोळखी झालें;
वठलेल्या अंधाराला
एकाकीपणाचीं फुलें.

फूल फूल जपें तरी
कुंद काळोखाचें पिसें;
काळजाच्या पैल कोटे
काजव्यांचे कवडसे.

अंगभर थकव्यांत
उभी थिजलेली रात;
पेंगुळल्या पापतळीं
एक अंगारते वाट.

सावल्यांत जगतांना
जग अनोळखी झालें;
गात्रागात्रांत पेटलीं
लक्ष ठिणग्यांचीं फुलें.

## सांज

ऐलपैल शांतलें नि सलिल स्तब्ध सावळें;
पिकून वेळ वाकली; दिशांत गंध वेगळे;
दिठींत गोठली निळी नसांतली अनंतता
दिगंत जोडुनी कुठे विसावलींत पाखरें ?
सुदूर सोनपाउलें धुळींत गुंफिलीं कुणी ?
वनांत सूर दाटतां मनांत मोर मोकळे
तुझ्या मिठींतलीं उन्हें दडून खोल राहिलीं;
इंद्रियांचिया अतीत क्षितिज एक रंगलें...

## एक कविता

दिशांत—
नांगरून पडलेलें एक मनोहर गाणें
कुसुंबी रंगाचें.

मनांत—
निःशब्द हुंकारणारें एक जख्मी जिणें
आभाळपक्ष्याचें...

## तळें

स्वच्छ एकटेंच तळें
सुखावलें चांदण्यांत.

## माझें घरटें उडालें

तुझ्या डोळयांत भोगिला
ओला आभाळाचा अर्थ;
आज वेगळ्या तृप्तींत
भिरीं आलीं घरव्यांत.

निळें नवल नभाचें
फांदीफांदीवर झुले;
तेंच पाहूं जातां झालीं
माझ्या पाखरांचीं फुलें.

आलीं ओंजळींत फुलें :
त्यांना गगनाचा गंध;
माझें घरटें उडालें
घेत गहनाचा वेध.

## गोंदण

थेंबथेंब चांदण्याची
कणाकणांत गोंदण;
सारें निवांत; दारांत
शिर्शिरतें केळपान...

# गंधाला मत्त लकेर

मनवाऱ्यानें झुलताहे
तंद्रीचें पिंपळपान;
निखळून पडे पायाशीं
घरट्याचें घायल भान.

जरतार तुझ्या स्मरणाचीं
गात्रांत वाहती गाणीं;
मी असा अनामिक फिरतों
तृप्तीच्या कोयळ-रानीं.

अनिकेत अशा अवकाळीं
स्पर्शाचा पागल पूर;
कां मनांत भिजते माती ?
गंधाला मत्त लकेर.

झाड

त्वचेच्या वाटेवरल्या वळणाची
जातच जगावेगळी :
त्या तिथेच असतें एक निनांवी झाड
केवळ दोन मनांच्या मिळणीच्या मध्यान्हीला
हिरवेंकंच...बहराला येणारें.

कुठून कुणास ठाऊक
कशीं स्वप्नाळून जागीं होतात तेव्हा
मूठभर मदनमस्त पाखरें
त्या झाडाच्या एखाद्या फाल्गुनफांदीवर
घरटें सजवून राहिलेलीं
मला नकळत.

त्वचेच्या वळणाची वाट संपते
तेथेही पुन्हा तें झाड असतें
रंध्रारंध्रांत संपूर्ण पालवलेलें
आणि त्या मूटभर पाखरांचे
प्राजक्तधुंद उषासूक्त माझ्या अरळ ओठांवर
माझ्याच काचेच्या डोळ्यांत आंदुळणाऱ्या
विषण्ण, निद्रिस्त विश्वाला
अकारण जागवणारें.

## वैशाखसोहळा

माझ्या उरीं एक नवल वर्तलें :
आज या उन्हाला फूल आलें.

खुडूं जातां खोल बोचतात काटे,
त्वचेच्या रानांत गंध दाटे.

पालवली तेथे चैतन्याची कळा;
वैशाखसोहळा थोर झाला !

## एक अभंग

माझ्या मुखीं आलीं
अंधाराचीं स्तनें,
ओठांत चांदणें
फोफावलें.

फोफावलें त्याचा
झाला महावृक्ष;
फाटलें आकाश
अदृष्टाचें

पैलाड भिडलें
प्राणाचें पाखरू;
नादले घुंगरू
अव्यक्ताचे.

अव्यक्ताचें सुख
ओसंडलें दिठीं;
अनंताची मिठी
रोमरोमीं.

# थेंब थेंब गाणें

थेंब थेंब पाखराचें
झडे थेंब थेंब गाणें;
ऐसें अनंताचें देणें
पामराला.

पापपुण्याईच्या पैल
आलें अथांगून नभ;
डोळां दिक्कालाचा कोंभ
आरपार.

थेंबाथेंबातलें गाणें
गेलें पेरीत पाखरूं;
भिडे त्याचा कल्पतरू
अदृष्टाला.

## हिरवे हिरवे मळे मनाचे

हिरवे हिरवे मळे मनाचे; हिरवा पक्षी उडे;
हिरवें हिरवें नेसुन कांही नजर नभाला भिडे.
तंद्रींतच परि लयींत झुलतो अवकाशाचा झुला;
दिशादिशांतुन गळे जुईचा गीतगंध कोवळा.
हिरवळलेली शेज; मदालस स्पर्शसुखाचा सडा;
भोवळलेलें गात्र गात्र अन् मुखांत श्रावणविडा.
हिरवे हिरवे मळे मनाचे; हिरवा पक्षी दडे :
पैलथडीच्या पल्याड कोठे प्राणांचे चौघडे.

## तंद्रींतलें विश्व

अदृष्टाच्या वाटे
अंतरींच्या खुणा;
फळूं आल्या आज
मौनांतल्या वेणा.

गर्भांत झुळ्‌झुळे
निरभ्रसा छंद;
पुनवेआधीच
चांदण्याला गंध.

सावरेना मुळी
निःशब्दाचा तोल;
तंद्रींतलें विश्व
आरासलें खोल.

## सांज घुंगुरली तेव्हा

नभ सोनाळलें तशी
पायीं घुंगुरली सांज;
माझी जखम नेसली
कुण्या स्मरणाचा साज.

आज ढळतांना दिस
रंग रंग उतूं आले;
दोन चुकार पारवे
माझ्या मनाशीं थांबले.

तेथे श्यामल क्षणांची
मंद पसरली धून;
इंद्रधनूंत स्वरांच्या
चिंब जगण्याची खूण.

सांज घुंगुरली तेव्हा
होरी खेळला श्रीरंग;
माझी फाटकीच कथा—
तिचा असंगाशीं संग.

# भेट

अनोळखी तेज
उंबऱ्यांत आलें;
जीवाला झोंबलें
दिव्य कांही.

ऐन तापत्रयीं
भर्जरली काया;
अत्तरला फाया
वेदनेचा.

पोळलेलें पुण्य
गळां घाली मिठी;
पुंडलिका भेटी
परब्रम्ह.

REFBK-0016282